# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/००१३०४**

**अपिलार्थी श्री. गोपीनाथ घरत**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
मुख्यमंत्री सचिवालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ३२

**प्रथम अपिलीय अधिकारी**
मुख्यमंत्री सचिवालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ३२

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६.०५.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १५.०५.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०४.०३.२०२५ | १७.०४.२०२५ | ०७.०४.२०२५ | २१.०५.२०२५ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०७.०६.२०२५ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १७.०४.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. ०४.०३.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"करारनामा नोंदणीकरिता मुद्रांक शुल्क, बिल्डर तथा करारनामा नोंदणी करिता, मुद्रांक शुल्क बिल्डर तथा विकासक यांनी करावयाचे आहे. असे शासनाचे धोरणात्मक निर्णय असुनही, करारनामा नोंदणीसाठी रक्कम रु. २,६२,७५०/- ची मागणी केलेवरुन ती त्यांना दि. २९.१२.२०२० रोजी रोखीने अदा करण्यात आलेली होती. दि. २३.०३.२०२१ रोजी करारनामा नोंदणीस १,७०,९५०/- व GST Rs. ४५,०००/- दि. १२.१२.२०२३, खर्च वजा जातां उर्वरित रक्कम रु. ४५,२५०/- मात्र आजपावेतो परत केलेली नाही. MAHA-RERA यांजकडे तक्रार करतां, तेथिल लोक सेवक बिल्डर तथा विकासक यांचे करता कार्यरत असल्याने पुर्तता नाही म्हणून प्रस्तुत शासन निर्णयाची प्रत न्यायालयीन कामासाठी मिळणेस विनंती. (सोबत वृत्तपत्रिय दि. ०६.०२.२०२२/०९.०२.२०२२ व ११.०२.२०२२ ची प्रत जोडली आहे."*

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. ०७.०४.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

..२/-

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.०४.२०२५ रोजी अपिलार्थींना कळविले की, आपल्या माहिती अर्जातील माहिती महसूल व वन विभाग यांच्याशी संबंधित असल्याने आपला सदर माहिती अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(३) अन्वये जन माहिती अधिकारी महसूल व वन विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मुंबई- ३२ यांना हस्तांतरीत करण्यात येत आहे.

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सुनावणी नोटीस प्राप्त असूनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २५.०५.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अपीलकर्ता यांच्या माहिती अर्जातील माहिती महसूल व वन विभागशी संबंधित असल्याने त्यांचा दि. ०४.०३.२०२५ रोजीचा माहिती अर्ज माहिती अधिकार अधिनियम, २००५ कलम ६(३) अन्वये जन माहिती अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-३२ यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आला व त्याबाबत अपिलकर्त्यास क्र. ८२१०४७७/२०२५/CMO(RTI), दि. १७.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात आली. त्याअनुषंगाने, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी "अपीलकर्ता यांचा दि. ०४.०३.२०२५ रोजीचा मूळ माहिती अर्ज या कार्यालयाच्या दि. १७.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी, महसूल व वन विभाग यांना हस्तांतरीत करण्यात आला आहे. त्यामूळे प्रथम अपील अर्ज महसूल व वन विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई या कार्यालयातील अपिलीय अधिकारी यांना सादर करावा. सदरचा अपील अर्ज या कार्यालयास विचारात घेता येत नाही. सबब, दि. ०७.०४.२०२५ रोजीचा प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे" असे नमूद करुन, ई-ऑफिस क्र. ८३७६३७८, दि. २१.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये सदर अपील निकाली काढण्यात आले आहे.

५. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप 29-5-2026

**मुंबई**
**दिनांक : २९.०५.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission Greater Mumbai